MHAU060000762014

## नियमित दिवाणी दावा क्र. ०२/२०१४ मधील नि.क्र. ६५ खालील आदेश

वादी यांनी सदर अर्ज प्रतिवादी क्रं. १ टिकाराम घोला राठोड चे वारस रेकॉर्डवर घेण्यासाठी दाखल केलेला आहे. सदरील प्रकरणात प्रतिवादी क्रं. १ हे दिनांक ३०.०४.२०२१ रोजी मयत झालेले आहेत. त्यांचे वारस चांदोबाई टिकाराम राठोड व यशोदाबाई आसाराम चव्हाण यांना प्रकरणात सामील करण्याची विनंती केली.

२. सदर अर्जास प्रतिवादी यांनी म्हणणे दाखल करुन सदर वादी यांनी हेतुपुरस्करपणे प्रकरण लांबविण्याकरिता वारस रेकॉर्डवर घेण्यासाठीचा अर्ज वेळेच्या आत दिलेला नाही व स्पष्टीकरणही दिलेले नाही. त्यामुळे अर्ज खर्चासहीत नामंजुर करावा अशी विनंती केली.

३. अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. युक्तीवाद ऐकला.

४. वादीने सदर दावा खरेदीखत बंधनकारक नाही असे घोषित होवुन मिळण्याकामी दाखल केलेला आहे. वादीच्या अर्जातील कथनानुसार प्रतिवादी क्रं. १ हा दिनांक ३०.०४.२०२१ रोजी मयत झालेला आहे. सदर प्रतिवादी क्रं. १ मयत झाल्यानंतर वादीने प्रस्तुत अर्ज दिनांक १७.०३.२०२२ रोजी दिलेला आहे. सदर वारस अभिलेखावर घेण्याकामी झालेला विलंब नि.क्रं. ६३ वरील आदेशानुसार माफ करण्यात आलेला आहे. मयत प्रतिवादी क्रं. १ यांचे वारस चांदोबाई टिकाराम राठोड व यशोदाबाई आसाराम चव्हाण यांची नांवे अभिलेखावर घेण्याकामी दाखल केलेला आहे. पंरतु यशोदाबाई आसाराम चव्हाण ही दाव्यात प्रतिवादी क्रं. २ म्हणुन या पुर्वीच समाविष्ठ झालेली आहे. त्यामुळे तिचे नांव पुन्हा अभिलेखावर घेण्याची गरज नाही. सदर दावा जाहीर ठरावाचा असल्याने मयत प्रतिवादीचे उर्वरित वारस चांदोबाई टिकाराम राठोड हिचे नांव दाव्याचा गुणदोषावर निर्णय होण्याकामी अभिलेखावर घेणे आवश्यक व गरजेचे आहे. तरी सदर कारणाचा व नैसर्गिक न्यायतत्वाचा विचार करता प्रतिवादी क्रं. १ चे वारस अभिलेखावर घेणे आवश्यक व गरजेचे आहे व त्यामुळे दाव्याच्या गुणदोषावर निर्णय होण्यास मदतच होणार आहे. करीता मी पुढील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. वादी यांचा नि.क्र ६५ चा अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. वादीने विहीत मुदतीत दुरुस्ती करावी.

Digitally signed by PRAMOD MANIK KOLSE
Date: 2022.06.09 17:26:08 +0530

**(पी.एम.कोळसे)**

दिनांक– ०८.०६.२०२२

दिवाणी न्यायाधीश, क. स्तर (न्यायालय क्रं.१)
कन्नड

**<u>प्रमाणपत्र</u>**

असे प्रमाणित करणेत येते की, पी.डी.एफ.निकालपत्र/आदेश यामधील सर्व मजकुर मुळ निकालपत्र/आदेशातील मजकुराप्रमाणे तंतोतंत खरा व बरोबर आहे.

लघुलेखकाचे नांव – यो. सु. माळी.

न्यायालयाचे नांव – प्रमोद मा. कोळसे.
दिवाणी न्यायाधीश, (क.स्तर),
तथा प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, कन्नड.

श्रुतलेखन दिल्याचा दिनांक – ०८.०६.२०२२.

न्यायिक अधिका–यांनी
निकालपत्रावर स्वाक्षरी केलेचा दिनांक– ०८.०६.२०२२.

निकालपत्र अपलोड केलेचा दिनांक – ०९.०६.२०२२.

..............................................................